Registered No. B. 2289.

# समाजस्वास्थ्य



वर्ष २ रें

अंक १०

एप्रिल १९२९

संपादक—र. धों. कर्वे

किमत दोन आणे

# अनुक्रमणिका.

| विषय. | | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| १. | प्रेमात्मक विवाह—४ ... ... ... | २१७ |
| २. | कसा मार्ग काढला? ... ... | २२३ |
| ३. | पचन कसें होतें? ... ... ... | २३३ |
| ४. | पत्रव्यवहार ... ... ... | २३७ |


संततिनियमनाकरितां

'मॅटोरी' वड्या वापरा

डझनाचे नळीस दीड रुपया.

स्त्रियांसाठीं व मुलींसाठीं महाराष्ट्रांतील पहिलेंच
सुंदर मासिक पुस्तक

सरस्वती

वर्ष २ रें, वर्षारंभ जानेवारी १९२९

वार्षिक वर्गणी मनीऑर्डरीनें फक्त चौदा आणे, व्ही. पी. नें एक रुपया एक आणा. नमुन्याचा अंक मागवा मोफत पाठवूं.

कुमारी गंगूबाई पाटील
सरस्वती—कार्यालय, बेळगांव.

# प्रेमात्मक विवाह-४.

माझी निंदा करणाऱ्या धर्मोपदेशकांपैकीं एकाच्या मुलीचें परवां लग्न झालें. लग्नापूर्वीं तिच्या नवऱ्यानें शाळेंतील सात मुलींशीं संबंध केला होता. हें लग्न चोरून झालें व आईबापांना दुसऱ्या दिवशीं कळवलें. आतां तो मुलगा इतर मुलींकडे पहात नाहीं, व तीं संततिनियमन करतात. अशीं अनेक उदाहरणें मला सांगतां येतील. त्यांचींच मुलें त्यांचा उपदेश घेत नाहींत.

येथील एक प्रसिद्ध स्त्री नेहमीं माझ्याविरुद्ध बोलत असते. संततिनियमन केवळ आत्मसंयमनानेंच केलें पाहिजे व आपण तें करतों अशी ती बढाई मारीत असते. परंतु तिचा नवरा दुसऱ्या एका बाईबरोबर बाहेरगांवीं जाऊन राहतो हें मला प्रत्यक्ष माहीत आहे !

अशाच आणखी एका बाईची मुलगी तीन पुरुषांबरोबर संबंध ठेवीत असे. आतां माझ्या सल्ल्यानें तिनें प्रेमात्मक विवाह केला आहे. आई मात्र मला शिव्या देते.

एकदां एका युनिव्हर्सिटीच्या प्रमुखानें मजवर टीका प्रसिद्ध केली. त्याच दिवशीं त्याच्या एका विद्यार्थ्याचें मला पत्र आलें. त्याचें व एका मुलीचें प्रेम होतें. पैसे नसल्यामुळें लग्न करतां येईना, व संबंध ठेवणें त्यांस रास्त वाटलें नाहीं. या स्थितीमुळें त्याला स्वसंभोगाची संवय लागली व ती सुटेना. तो मुलगा त्या अधिकाऱ्याकडे न जातां मजकडे कां आला ? कारण तो नैतिक बाबावाक्यें सांगणार, व त्यांचा उपयोग नसतो.

पुष्कळ धार्मिक लोक सुद्धां संततिनियमनाची माहिती विचारण्याकरतां मजकडे येतात. मी नांव दिलेल्या डॉक्टरांकडून ते माहिती मिळवून तिचा उपयोगही करतात, परंतु कबूल मात्र करीत नाहींत. धार्मिक परंतु समंजस आईबाप आपल्या मुलांमुलींच्या लग्नाच्या पूर्वीं त्यांसही ही माहिती मिळवून देतात.

कांहीं मुलगे व मुली लग्नापूर्वीच याचा उपयोग करतात. अशा एका जोडप्यानें नंतर लग्न केलें. त्यांच्या आईबापांस हें सर्व माहीत होतें परंतु त्यांनीं तसें कांहीं न दर्शवितां तिकडे कानाडोळा केला होता, व हे सर्व अत्यंत धार्मिक लोक होते.

अशाच एका धार्मिक मनुष्यानें, कामवासनेच्या भरांत एक मुलगी लग्नाशिवाय मिळत नाहीं असें पाहून, तिच्याशीं लग्न केलें. त्यांचें प्रेम लौकरच संपलें, परंतु दोन वर्षांत दोन मुलें झालीं, आणि पैसे नव्हते त्यामुळें हाल होऊन दोघेंही एकमेकांस दोष देऊं लागलीं. नंतर त्याचें प्रेम दुसऱ्या एका मुलीवर बसलें, व ही गोष्ट मनापर्यंतच थांबली नाहीं. तिला गर्भ राहिला, व आतां काय करावें असें तीं मला विचारूं लागलीं. घटस्फोट करावा तर मुलांचे हक्क बुडतात, नाहींतर दुसऱ्या मुलीची बेअब्रू होते, व सर्वांचेच हाल होतात. यानें पहिला ' प्रेमात्मक विवाह ' केला असता, म्हणजे मुलें न होतां सर्व भानगड मिटली असती.

न्यू यॉर्क मध्यें असा एक कायदा आहे कीं दोन साक्षीदार ठेवून कोणत्याही जोडप्याला खाजगी लग्न करतां येतें, व त्याला धार्मिक किंवा कायदेशीर कोणताही विधि लागत नाहीं. मात्र हें लग्न एक महिन्याचे आंत सरकारांत कळवावें लागतें असें न केल्यास त्यांपैकीं कोणासही लग्न नाकबूल करतां येतें, परंतु दोघें खुषी असल्यास तें कायदेशीर लग्नच राहतें. म्हणजे ज्यांना प्रेमात्मक विवाह करणें असेल त्यांनीं असें खाजगी लग्न करून सरकारांत कळवलें नाहीं म्हणजे झालें पुढें कोणीही एकानें नाकबूल केल्यास तें मोडतां येतें. मात्र मुलें झाल्यासही यांत फरक होत नाहीं. तो फरक असावा, म्हणजे मुलें झालेल्या जोडप्यास केवळ एकाच्या खुषीनें घटस्फोट मिळूं नये, असें माझें म्हणणें आहे.

बर्ट्रान्ड रसेल् यांनीं मला एका पत्रांत लिहिलें आहे कीं ' धार्मिक लोक आपल्या विरुद्ध आहेत याचें मला नवल वाटत नाहीं. कारण लोकांच्या कामवासनेचा भंग आणि आपण पापी आहोंत या कल्पनेचा प्रसार हे दोन धर्माचे आधारस्तंभ आहेत. अर्थात समंजस मनुष्य नैसर्गिक कामशांतीला पाप समजत नाहीं.

परंतु तिलाच पाप म्हटल्यानें धर्मांचीं वरील दोन्ही कामें होतात. तेव्हां समंजसपणाची नीति धर्माला रुचत नाहीं. विवाहासंबंधीं माझी कल्पना आपल्याही पलीकडे आहे. मुलें नाहींत तोंपर्यंत दोन माणसांच्या समागमांत समाजाचा संबंध पोंचत नाहीं, आणि स्त्री गर्भवती आहे असें डॉक्टरचें सर्टिफिकीट असेल तरच तिचें लग्न व्हावें असें माझें मत आहे. अर्थात मुलें असल्यास क्षुल्लक कारणावरून घटस्फोट करूं देऊं नये. पतिपत्नींना व्यभिचार करण्यास परवानगी असावी, पण इतरत्र मुलें मात्र होऊं देऊं नयेत, कारण तें मुलांच्या दृष्टीनें गैर आहे. प्रजोत्पादनांत सहकारिता हाच मीं लग्नाचा अर्थ समजतों. धर्म हा स्नेहभावाचा व माणुसकीचा शत्रू आहे असें मी नेहमीं म्हणत आलों आहें.'

... ... ... ... ... ...

वकील लोक प्रेमात्मक विवाहाच्या विरुद्ध असतात कारण हल्लींच्या कायद्याच्या बावळटपणामुळें घटस्फोटाचा अर्ज करतांना जज्जाच्या डोळ्यांत धूळ टाकण्याकरतां त्यांना सपाटून पैसा मिळतो, तो कायदा बदलल्यास मिळणार नाहीं. बऱ्याच वकीलांचें पोट यावरच भरतें, तेव्हां ते साहजिकच माझ्या विरुद्ध आहेत. पण तेही माझें म्हणणें आंतून कबूल करतात, असें मला एका वकील मित्रानें सांगितलें. हा धंद्याचा प्रश्न आहे, बऱ्यावाइटाचा नाहीं.

... ... ... ... ... ...

डेव्हिस नांवाच्या एका डॉक्टरणीनें १९२२ सालीं एक हजार स्त्रियांना संततिनियमनासंबंधीं मत विचारलें होतें. पैकीं ७५४ नीं उत्तरें पाठवलीं व यांत ६९१ पदवीधर होत्या. तीन चतुर्थांश स्त्रियांनीं आपण कृत्रिम उपाय वापरतों असें सांगितलें, व फक्त ७८ स्त्रियांनीं या उपायांविरुद्ध मत दिलें. हल्लीं हे उपाय न वापरणाऱ्या स्त्रिया म्हणजे अज्ञ तरी असतात किंवा वंध्या असतात असा माझा अनुभव आहे, व या बाबतींत कायद्याला कोणीहि भीक घालीत नाहीं.

रोमन कॅथॉलिक पंथाचे मतें संततिनियमनाचा एकच मार्ग क्षम्य आहे, व तो म्हणजे पतिपत्नींनीं खुषीनें एकमेकांपासून अलिप्त राहणें. त्यापैकीं एकाच्या इच्छेविरुद्ध दुसऱ्यानें ब्रम्हचर्य आचरलें तरीही पाप लागतें. याचा अर्थ साधारणतः

स्त्रिया गुलाम आहेत व त्यांनीं नवऱ्याचें ऐकलेंच पाहिजे, असा होतो. वस्तुतः जुनी ख्रिश्चन समजूत म्हणजे कामवासना किंवा निदान संभोग हें पाप आहे, व मनुष्य ज्या मानानें संभोग कमीजास्त करील त्या मानानें तो चांगला किंवा वाईट ठरतो. आतां विवाहाशिवाय संभोग केल्यास मनुष्य नरकांत पडून कालाच्या अंतापर्यंत जळत राहणार, तेव्हां 'जळण्यापेक्षां लग्न करणें बरें,' असें सेंट् पॉलचें वाक्य आहे.

पशूंमध्यें संभोग प्रजोत्पत्तीपुरताच होतो व हें नैसर्गिक आहे, असें कांहीं म्हणतात. मनुष्याची कामवासना इतक्यावरच थांबत नाहीं, म्हणून आपण पशूंपेक्षां वाईट, व आपली ही 'पाशवी वृत्ति,' पशूंप्रमाणें आपण नेमस्त केली पाहिजे. 'पाशवी वृत्ति' मनुष्यांना असते आणि पशूंना नसते, असें एकंदरींत धार्मिक लोकांचें म्हणणें दिसतें. पशू जर आपल्यापेक्षां चांगले आहेत, तर 'पाशवी' वृत्ति वाईट कीं चांगली ? हें धार्मिक लोकांनींच ठरवावें.

वास्तविक पाहतां चित्रकला, साहित्य, संगीत, व धर्मसुद्धां कामवासना व कल्पनाशक्ति यांच्या संयोगापासून उत्पन्न झालीं आहेत, व पशु व मनुष्य यांत हाच फरक आहे. यामुळेंच प्रजोत्पादनापेक्षां कामवासनेचा मनुष्यास पुष्कळ अधिक उपयोग आहे हें विसरतां कामा नये. धार्मिक स्त्रियांनी नवऱ्यांस ब्रह्मचारी रहावयास लावल्यास ते लगेच इतर स्त्रियांशीं संबंध जोडतात हें मला प्रत्यक्ष माहीत आहे. शिवाय संततिनियमनास ज्यांचा धर्म आड येतो, अशा स्त्रिया गर्भपात करायला मुळींच मागेंपुढें पहात नाहींत.

मला एका बाईकडून पुढील पत्र आलें आहे:—' मला गेल्या सहा वर्षांत चार मुलें झालीं व पांचव्याची तयारी आहे. आम्ही एकंदर सहा डॉक्टरांस विचारलें परंतु संततिनियमनाचे मार्ग धोक्याचे आहेत असें ते सांगतात. हे सर्व खोटें बोलतात काय ? आम्ही नैसर्गिक रीतीनें राहिल्यास आम्हांला आणखी दहा बारा मुलें सहज होतील. हें मूल झाल्यावर आमचें घर विकावें लागेल, एरव्हीं खर्च भागणार नाहीं. आणखी झालीं तर काय होईल कोणाला ठाऊक ? अशा स्थितींत कोणाला सुख लागणें शक्य नाहीं......

## प्रेमात्मक विवाह

या बाईला व इतर सर्वांना मी असें सांगतों कीं अमेरिकन बर्थ कॅन्ट्रोल लीगकडे संततिनियमनाची माहिती मिळते. शास्त्रीय मार्गांनीं इजा बिलकूल होत नाहीं, व काळजी घेतल्यास ते फसतही नाहींत. वरील सहा डॉक्टर अत्यंत मागसलेले किंवा पारंपरिक असले पाहिजेत. एका एम्. डी. डॉक्टराचें मला पत्र आलें आहे. त्याला याबद्दल माहिती नाहीं, परंतु मिळवण्याची इच्छा आहे. असे डॉक्टर पुष्कळ असतात हें आश्चर्य आहे. त्यांस किंवा कोणासही माहिती वरील लीगकडे मिळेल [ हिंदुस्थानांत ही माहिती 'राइट एजन्सी, २० भटवाडी रस्ता, गिरगांव, मुंबई येथें मिळेल.—सं. ]

माझे मतें ही माहिती सर्व स्त्रियांस मिळाली पाहिजे, मग त्या विवाहित कीं अविवाहित, सुदृढ किंवा रोगट हें पाहतां कामा नये. हा सर्व स्त्रियांचा हक्क आहे. इतरांच्या नीतीवर पहारा करण्याऐवजीं लोक स्वतःच्या नीतीकडे अधिक लक्ष देतील तर बरें.........

प्रेमात्मक विवाहाचे दृष्टीनें कायद्यांत तीन गोष्टी आल्या पाहिजेत. ( १ ) संततिनियमनाची माहिती देण्याविरुद्ध असलेला मूर्खपणाचा कायदा रद्द केला पाहिजे. ( २ ) जेव्हां एखाद्या विवाहित जोडप्यास संतति नसेल, तेव्हां त्यांच्या इच्छेनें खर्च किंवा वेळ लागल्याशिवाय, त्यांना घटस्फोट मिळाला पाहिजे, व लग्न करतांना जशी वकिलाची जरूर नसते, तशीच यावेळींही पडतां कामा नये. ( ३ ) तिसरा प्रश्न पोटगीचा. स्त्री सुदृढ व स्वतःचें पोट भरण्यासारखी असेल, तर तिला पोटगी देऊं नये. अर्थात् प्रेमात्मक विवाहांत पुष्कळ वेळां दोघेंही पैसे मिळवीत असतील, तेव्हां पोटगीचा प्रश्नच नाहीं. परंतु याचा विचार जजानें प्रत्येक वेळीं परिस्थितीचे मानानें केला पाहिजे.

अर्थात इतर पुष्कळ सुधारणा करणें जरूर आहे, पण त्या नंतर करतां येतील. कोणत्याही प्रकारच्या लग्नापूर्वी दोघांची डॉक्टरी तपासणी करून संसर्ग-जन्य रोग असेल, तर त्यांस लग्नच करूं न देणें, व आनुवंशिक रोग असल्यास शस्त्रक्रियेनें संतति बंद करणें जरूर आहे. हल्लीं कशाही रोग्यांस लग्न करून रोगांचा प्रसार करण्याची पूर्ण परवानगी असते, ती असतां कामा नये......

# समाजस्वास्थ्य

बहुतेक लोकांस मुलें पाहिजे असतात असा माझा अनुभव आहे. तेव्हां संततिनियमनाची माहिती मिळाल्यास मनुष्यजातीच अजीबात नष्ट होईल ही भीति निराधार आहे. मात्र मुलें किती आणि केव्हां व्हावीं हें प्रत्येक स्त्रीस स्वतः-पुरतें ठरवतां आलें पाहिजे. कोणास मुळींच मुलें नको असतील तर ती त्यांच्या मर्जीची गोष्ट आहे.

घटस्फोटाचे बाबतींत एकास तो पाहिजे व दुसऱ्यास नको असें झाल्यास काय करावें हें जज्जास ठरवावें लागेल. जेथें दोघांची एकत्र राहण्याची कबुली नाहीं व संततीहि नाहीं, तेथें घटस्फोट करण्यांतच सर्वांचा फायदा आहे. प्रेम हें मागून मिळत नसतें, व तें न मिळाल्यामुळें कांहीं लोकांचे हाल होतील पण याला कोण काय करणार? दोघांना जबरीनें एकत्र रहावयास लावण्यानें प्रेम उत्पन्न होणार नाहीं. मुलें असलीं तरी सुद्धां आईबापांचें वितुष्ट मुलांनीं पाहण्यापेक्षां त्यांनीं वेगळें झालेलेंच बरें.........

याप्रमाणें खुषीनें वेगळी राहिलेली एक बाई मला लिहितेः—' तो (नवरा) मला मुलाच्या खर्चाला पैसे देतो; व मी आजारी असल्यास तो मला मदत करील अशी माझी खात्री आहे.' नवरा दुसऱ्या एका बाईला घेऊन राहतो. कांहीं बायका मुलांच्या सुखाकरितां नवऱ्यांना बाहेर वाटेल तें करण्याची मोकळीक देतात व तशाच चिकटून राहतात. वरील बाई स्वतःचें पोट भरते, पण मुलाचा खर्च नवरा देतो. कांहीं बायकांना वेगळें झाल्यावर नवऱ्याकडून पैसे घेण्यांत कमीपणा वाटतो. कांहीं तो आपला हक्कच समजतात, व मिळविण्याची शक्ति असूनही स्वस्थ बसून खातात. कांहीं तर मुद्दाम एखाद्या श्रीमंत मनुष्यांशीं लग्न करून नंतर घटस्फोट मिळवून पोटगीच्या द्वारें जन्माची तरतूद करून ठेवतात.

पोटगीच्या बाबतींत अत्यंत अन्याय होत असतो. माझ्याच कोर्टांत परवां एका २५ वर्षांच्या बाईनें नवऱ्यावर पोटगीची फिर्याद केली. तिला आपल्या पोटा-पुरतें सहज मिळवतां आलें असतें, म्हणून ज्यूरीचें एकमत होईना. तेव्हां खटला दुसऱ्या ज्यूरीपुढें पुनः चालला व त्यांनीं पोटगी द्यावी असें ठरवलें. तेव्हां त्यानें महिना ५० डॉलर पोटगी द्यावी असा हुकूम देणें मला भाग पडलें.

एका खटल्यांत नवरा ४० वर्षांचा व बायको २८ वर्षांची असून तिला १५० डॉलर पगार होता व नवऱ्याला २०० होता. तरीं घटस्फोटानंतर नवऱ्यानें बायकोच्या वकिलास २०० डॉलर फी व तिला महिना ७५ डॉलर पोटगी द्यावी असा कोर्टानें हुकूम दिला. म्हणजे तिचें उत्पन्न महिना २२५ डॉलर झालें व नवऱ्याचें १२५ झालें, व शिवाय त्याला दोन्ही वकिलांची फी द्यावी लागली. यापेक्षां आणखी मूर्खपणा कसा असायचा ! (अपूर्ण)

---

# कसा मार्ग काढला ?

(लिहून आलेला मजकूर)

## आधुनिक रशियांतील एक गोष्ट

(निकोलाय ओग्न्येव् यांच्या पुस्तकावरून)

गिरणीजवळच्या कामकऱ्यांच्या क्लबाच्या दारावरील तांबडा दिवा नेहमीं-प्रमाणें सभासदांचें स्वागत करीत होता, पण आज मानिका गुसिकोवा हिला आंत जावेंसें वाटेना. शेवटीं एकदांचा मनाचा धडा करून ती तंबाखूच्या धुरानें भर-लेल्या पुढच्या दालनांत शिरली. हें दालन काम करून थकल्या भागलेल्या मजुरांनी भरून गेलें होतें व कोणी गप्पा मारण्यांत, कोणी वर्तमानपत्र वाचण्यांत, कोणी वादविवाद करण्यांत गढून गेलीं होतीं. बाह्य व्यवहार जरी नेहमींप्रमाणेंच चालले होते, तरी मानिकाच्या हृदयांत मात्र शांतता नव्हती. आपण अशुद्ध आहों, क्लबांतील इतर सभासदांच्या तोंडाला आपण काळोखी फांसली—त्यांना आज आपल्यामुळें मान खालीं घालावी लागेल, हा विचार तिला स्वस्थ बसूं देईना. मानिका दालनांत येतांच तिच्या मैत्रिणींनीं तिला आपल्या ताब्यांत घेतली आणि ग्रामोफोनच्या साथीवर त्या तिच्याबरोबर नाचूं लागल्या. कशीबशी त्यांच्या तावडींतून सुटून ती पलीकडल्या मोठ्या खोलींत गेली, पण तेथें मात्र तिला उभें राहवेना. तिच्या डोळ्यांपुढें अंधारी येऊन काजवे चमकूं लागले व ती एकदम

मट्कन् जमिनीवरच बसली. त्याच खोलींत बोलोडिका आपल्या मित्रांबरोबर एका कोपऱ्यांत बसला होता व नेहमींप्रमाणें कांहीं तरी आचरट गोष्टी सांगत होता व ते फिदीफिदी हंसत होते.

त्या घोळक्यांतूनच २–३ मंडळी पुढें आली आणि त्यांनीं मानिकाला उचलून एका बाकावर ठेवली. लागलीच कोणीतरी थंडगार पाणी तिच्या तोंडांत घातलें व तिनें एकदां डोळे उघडून पुन्हां मिटले. तिच्या मित्रमैत्रिणींचा घोळका तिच्याभोंवतीं जमला होता. "आतां त्यांना सगळं कळलं असेल—" मानिकाच्या मनांत आलें. बोलोडिका मात्र हंसत होता. तिच्या कानावर नानाप्रकारचे शब्द येत होते.—

"...दवाखान्यांतला माणूस बोलवा......"

"......अं: ! ती आपण होऊनच जागी होईल..."

"......काय तरी बाई ही मूर्च्छा..."

"...काय मूर्ख आहेस ग ? दिसत नाहीं तुला ती आजारी आहे तें ?..."

"...झालंय् काय आजारी पडायला ?..."

आणि अखेरीस ......"श्यालोला सांगितलं पाहिजे !"

( श्यालो हा पूर्वीच्या कारकीर्दीत गुन्हेगार व लुटारू म्हणून नांवाजलेला पण सोव्हिएट कारकीर्दींत मजूरांचा पुढारी व नेता मजूर होता. )

हे शेवटचे शब्द ऐकतांच मानिका ताड्कन् उठून उभी राहिली. "कांहीं नको श्यालोला बोलवायला. मला कांहीं झालं नाहीं—मी चांगली खडखडीत बरी आहें.' इच्छा व शक्ति यांच्यांतला फरक मानिकाला आतां कळला. तिच्या पाया खालची जमीन एकदम बाजूला सरली व जणूंकाय आपोआपच एक बांक तिच्या शरीराखालीं आलें.

'मित्रहो बाजूला व्हा. ती आजारी आहे—तिला जरा शुद्ध हवा मिळूं द्या.' श्यालोचा गंभीर आवाज खोलीच्या दारांतून ऐकूं आला. आतां मात्र मानि-

काला खरोखरच भीति वाटूं लागली. आतां क्लबाच्या सर्व सभासदांपुढें आपली बेअब्रू होणार—श्यालो आपली चांगली खरड काढील—आणि हे आपल्याला घालवून देतील हा विचार तिच्या मनांत आला !

जरा बरें वाटतांच श्यालो म्हणाला 'आतां तुला उठतां येतें कां ?' होतें नव्हतें तेवढें बळ खर्च करून मानिका उभी राहिली आणि क्लबाच्या दाराकडे जातां जातां म्हणाली—'जातें. मी आपण होऊनच जातें—तुम्हीं घालवून देऊन मग जाण्यापेक्षां तशीच गेलेली काय वाईट ? ' पण श्यालोनें लागलीच तिचा हात घट्ट धरला व तो एकाद्या सेनापतीप्रमाणें आज्ञा करून म्हणाला " माझ्या-बरोबर चल वाचनालयांत. "

श्यालोला व मानिकाला जावयाला इतरांनीं भराभर वाट करून दिली व तीं वाचनालयांत आलीं. मंडळीस उद्देशून श्यालो म्हणाला–" मित्रहो जरा ५ मिनिटें बाहेर जा. " लागलीच वाचणाऱ्या मंडळींनीं वर्तमानपत्रें गुंडाळलीं, पुस्तकें मिटलीं आणि श्यालो व मानिका एकटींच वाचनालयांत राहिलीं. श्यालो एका बांकावर बसला आणि आपली तीक्ष्ण दृष्टी मानिकेच्या चेहेऱ्यावर लावून तो म्हणाला— " मानिका, हा काय प्रकार आहे ! " मानिकेला जवळजवळ हंसू आलें ! श्यालोला अजून कांहींच ठाऊक नाहीं तर मग ! कदाचित कांहींतरी सबब सांगून वेळ मारून नेली तर क्लबांतून जाण्याचा प्रसंग कदाचित् टळेलही ! " माझ्या आईचें व माझें भांडण झालें—तिनें मला घरांतून घालवून दिलें–" मोठ्या धिटाईनें ती श्यालोकडे पहात होती. त्याचे दयाळू पण शोधक डोळे एकसारखे टक लावून पहात होते. एवढेंच नव्हे तर त्याच्या कपाळावरची ती भयंकर आठी देखील आज नाहींशी झाली होती. श्यालोचा चेहेरा असा दिसूं शकेल ही कल्पना देखील मानिकाच्या मनांत कधीं आली नव्हती.

" कशाबद्दल तिनें तुला घरांतून घालवून दिलें ? "

या प्रश्नाचें उत्तर द्यायची मात्र मानिकाची तयारी नव्हती. बराच वेळ ती कांहींच बोलली नाहीं.—

" काय ग, बोलत कां नाहींस ? "

आतां मात्र तिला श्यालोकडे पाहावेना व ती एकदम आपल्या पायांकडे पाहूं लागली.—एकदम तिच्या खांद्यावर एक हात ठेऊन श्यालोनें विचारलें "पण अजून अवकाश आहे ना थोडा ?" तापलेल्या लोखंडाच्या रसाप्रमाणें श्यालोचे शब्द तिच्या कानांत शिरले—

"श्यालो, कसंही कर पण रागवूं नको. मीं तुला उत्तर दिलं नाहीं, पण मी तरी काय सांगूं ? मला एकसारखं कसं तरी वाटतं—माझ्या आईपेक्षां देखील तुझ्यावर माझा विश्वास अधीक आहे. मी तुला सगळं सांगतें, रागावूं मात्र नकोस. मी आपण होऊनच क्लब सोडून जाईन पण तूं कोणाला सांगूं मात्र नकोस. मला ठाऊक आहे तूं किती चांगला—"

मानिकाला बोलवेना. इतका वेळ बोलल्यामुळें तिला गुदमरल्यासारखें झालें.—ती उठून उभी राहिली—

"मला अगदीं बरं वाटत नाहीं—कांहीं खाववत नाहीं. फक्त मासे खावेसे वाटतात—आणि—आणि—या वेळेला—तें पण चुकलं—इतर मुलींना होतं तें—आणि—आणि मी तर फक्त एकाच्याच बरोबर जात असें—.........हें आतां असं झालं !..."

ती पुन्हां बांकावर बसली आणि हातांत तोंड झांकून रडूं लागली. श्यालो आतां आपली मानगुटी धरून आपल्याला बाहेर काढून लावणार ही भीति कांहीं तिला सोडीना.

"तुझ्या आईला कळलं वाटतं तें ?"

"नाहीं. अजून तरी तिला कांहीं ठाऊक नाहीं. ती एकसारखी टक लावून माझ्याकडे बघते. तिनं मला घरांतून घालवून दिलं हें मात्र मीं तुला खोटं सांगितलं. तिला सर्व कळलं म्हणजे मग मात्र ती घालवून देईल हें खास."

मानिकाचा आवाज कापूं लागला. डोळ्यांतून अश्रू यावेत त्याप्रमाणें एकएक अक्षर तिच्या तोंडांतून निघत होतें. आतां तिला संताप आला. कां उगीच हा राक्षस मला छळतो आहे ? एकदां मला घालवून दे नी हो मोकळा !

" मग तूं क्लबांतून कां निघून जातेस ? "

" सगळ्या पोरी माझी थट्टा करून मला जीव नकोसा करतील " मानिका ओरडली " आणि पोरगे ? ते काय हा सगळा प्रकार स्वस्थपणें पहात राहतील ? आणि तूं ? मला सगळं ठाऊक आहे. मी घरांतून पळून जाईन.—रस्त्यांत जाऊन पडेन.—कसंही पोटाला मिळवीन.—एकदां त्या मार्गाला लागलेंच आहे—तर तेंच पुढें. जा. सगळीं चालतीं व्हा. जें काय माझं व्हायचं असेल तें होईल—" मानिका दरवाजाकडे धांवली. पुन्हां एकदां श्याली गर्जला " मानिका गुसीकोवा, उभी राहा. " विजेचा झटका बसावा त्याप्रमाणें मानिका उभी राहिली.

" अस्सं. असा प्रकार आहे काय ? कांहीं हरकत नाहीं. अजूनही सर्व ठीक होईल. कसें व केव्हां तें इतक्यांतच मी तुला सांगत बसत नाहीं. उगीच वेळ घालण्यांत अर्थ नाहीं. फक्त एका प्रश्नाचें उत्तर दे. या वेळेला मात्र खोटं सांगूं नकोस. हा कोण ? किंवा, तो आपल्या क्लबांतलाच आहे कां ?

एका तासापूर्वीं, प्राण गेला तरी या प्रश्नाचें उत्तर मानिकानें दिलें नसतें. पण साऱ्या लोकांच्या देखत त्यानें चेष्टा करून तो हंसला याचा तिला भयंकर राग आला होता.

" तो वोलोडिका—आचरट पोरगा. "

" अस्सं काय ! तो मात्र क्लबमध्यें बसून चैन करतो आणि तुझी ही स्थिती. आणि तुझ्याशीं लग्न करायला तो कबूल नाहीं काय ? "

" मी नाहीं त्याला विचारलं. पंधरा दिवस त्यानं मला तोंडच दाखवलं नाहीं. अखेरीस काल तो मला भेटला तेव्हां—तेव्हां मी त्याला सगळं सांगितलं. प्रथम तो कांहींच बोलला नाहीं—मग मलाच शिव्या देऊं लागला. आणि मग—मग——"

" मग काय ? "

" मग तो एकदम पळूनच गेला.—अगदीं अक्षरश: पळून गेला. आज मी पुन्हां त्याला विचारणार होतें पण तो इतर पोरांच्यांत उभा राहून नुसता हंसत खिदळत होता——"

" हरकत नाहीं. अजून सर्व ठीक होईल. धीर मात्र सोडूं नकोस. माझ्यावर विश्वास आहे ना तुझा ? "

" हो "

" तर मग आतां आंतल्या खोलींत जा आणि मी हांक मारीपर्यंत वाट पहा"

" आणि इतर पोरी ? त्यांना तर सगळं कळलं असेल ? '

' तूं सांगितलंस कीं काय ? '

' नाहीं. पण त्यांना कळायला काय वेळ लागणार ? '

' चल. मूर्ख कुठची, कोणाला कांहीं कळलं नाहीं. जराशीं कुजबुजतील नी गप्प बसतील.— हो खरंच. वय काय तुझं ? '

' सतरा. १९०७ मधला माझा जन्म. '

' अरेरे काय हा पाजीपणा !—छे तुला नाहीं मी म्हटलं—वोलोडिकाला. जा तर मग. '

श्यालो आखाड्याच्या दाराशीं गेला आणि तांबड्या चड्ड्या घालून निरनिराळे खेळ खेळणाऱ्या आपल्या मित्रांना म्हणाला—' मित्रहो निजायच्या खोलींत चला. ' पटापट सर्वांनीं आपले शर्ट व विजारी चढवल्या आणि ते श्यालोच्या मागून चालूं लागले. क्लबाच्या ज्या सभासदांना तेथें रात्रीं काम असे त्यांच्या निजण्याची सोय सर्वांत मागच्या दालनांत केलेली होती. तेथें पोंचल्याबरोबर श्यालोनें एकदां चोंहीकडे दृष्टी फेंकली आणि म्हणाला—' आपल्या पैकीं ३–४ कमीच आहेत; पण हरकत नाहीं. दोस्तहो—आपल्यापुढें आज एक फार महत्त्वाचा प्रश्न आहे. मानिका गुसिकोवा गरोदर आहे असें दिसतें व त्याचें कारण म्हणजे वोलोडिका हा आचरट पोरगा आहे. लग्न करायचें मात्र त्याच्या मनांत दिसत नाहीं एवढेंच नव्हे तर तिची आपली ओळख देखील नाहीं असें दाखवण्याचा त्याचा प्रयत्न दिसतो.'— आतां मात्र श्यालोचा राग अनावर— ' असल्या पाजी पोराला क्लबांतून हाकलून लावावें हें तर उघडच आहे. मी देखील पूर्वी कांहीं मोठा सद्गुणांचा पुतळा नव्हतों. पण एकानें आपले वाईट गुण टाकले आणि

दुसऱ्यानें ते तसेच ठेवले एवढाच काय तो फरक. मला तर वाटतें तिच्याशीं लग्न करायला आपण त्याला भाग पाडलें पाहिजे. "

' हं–तें कांहीं इतकं सोपं काम नाहीं. ' एक किडकिडीत व उंच असा मजूर म्हणाला. तो म्हणेल मला यांतलं एक अक्षरही ठाऊक नाहीं ! '

' मी म्हणतों, समजा आपण आज त्याला लग्न करायला भाग पाडलं आणि उद्यां त्यानें काडी मोडून घेतली–तर मग काय राहिलं त्यांत ! एक तरूणसा मुलगा म्हणाला.

' अं, त्यांत कांहींच अर्थ नाहीं आक्टिर्किन ' श्यालो ओरडला. आपण त्याच्यावर पाळत ठेवली पाहिजे. निदान पोटगी तरी त्यानें दिलीच पाहिजे."

" बाबारे, अशा बळजबरीच्या लग्नानें तिची स्थिति सुधारेल असें तुला वाटतें कां ? उगीच त्याच्या हातचा मार मात्र तिला खावा लागेल.—आणि या फटिंगाकडून पोटगी मिळण्याची आशा मला तरी दिसत नाहीं ! " किडकिडीत तरूण उद्गारला.

" उलटी तीच पळून जाईल दुसऱ्या दिवशीं त्याच्यापासून " आक्टिर्किन म्हणाला.

" हं, तेंही खरं—हेंही खरं—काय बरं करावं आपण ? जरा डोकं खाजवण्यासारखाच प्रश्न आहे हा ! " वासिका पुटपुटला.

" अरे मूर्खांनों थांबायची का ही वेळ आहे ? आत्तांच्या आत्तां काय तो निकाल लावून पुढच्या तजविजीला लागलं पाहिजे आपण. ती बिचारी बाहेर वाट पहात बसली आहे नी तुमचा चालला आहे विचार ! " श्यालो टेबलावर हात आपटून ओरडला.

" तर मग आपण क्लबांतच तिची व्यवस्था करूं व मग काय तें ठरवूं. तिच्या आईला कांहींच न कळवतां आपण तिची राहण्याची सोय येथेंच करूं म्हणजे झालें. " आक्टिर्किन म्हणाला.

" मला या साऱ्या प्रकारांत एकच उपाय दिसतो—गर्भपात. " आतापर्यंत गप्प बसलेला एक दोस्त म्हणाला.

एकदम खोलींत पूर्ण शांतता झाली. कांहीं वेळ कोणींच कांहीं बोलेना. अखेरीस श्यालो म्हणाला " पण तें जरा धोक्याचंच नाहीं कां ? " " छे रे बुवा आपण एका चांगल्या डॉक्टरकडे जाऊं म्हणजे झालें " " पण पैशाची रे काय व्यवस्था ? क्लबच्या तिजोरींत तर शिल्लक मुळींच नाहीं म्हणून तुमची ओरड असते आणि हा खर्च कोण करणार ? कायरे आक्टिर्कीन ? "

" पैशाचें पाहूं रे आपण कसें तरी—पण जर कां हें बाहेर आलें तर आधींच आपल्या क्लबबद्दल लोक हवें तें बोलतात, नी मग काय..."

" काय बिशाद आहे कोणाची यांतलं एक अक्षर बाहेर फोडायची ! असा लंबे करीन एकेकाला.. " श्यालो गुरगुरला.

" वासिका तूं सरकारी इस्पितळांत जाऊन सर्व व्यवस्था कर. मग पाहतों मी बाकीचें सर्व. "

वासिकाबरोबर ती जेव्हां इस्पितळांत गेली त्या क्षणालाच तिचें रूपांतर होऊन " नं १०२. वय १७. मजूर. " हें नांव तिला प्राप्त झालें. थोड्याच वेळांत नर्सनें तिला पांढरे शुभ्र कपडे घातले आणि म्हणाली —" माझ्या मागून चला " आंत जातांच आजूबाजूच्या बिछान्यांतून प्रत्येक चेहेरा " बरी खोड मोडली. तुला असंच पाहिजे. " असंच म्हणतो आहे असें तिला वाटलें.

ऑपरेशन-रूममध्यें एक वृद्ध डॉक्टर हात पुशीत पुशीत तिच्याकडे आला व म्हणाला—" तुम्हांला आपलं बाळ नको आहे कां ? अरेरे ! गरीब बिचारी आई. काढा तर कपडे ! "

मानिका गुसिकोवा कपडे काढून निमूटपणें टेबलावर निजली व तिनें डोळे मिटून घेतले. इतक्यांत कोणी तरी तिचे हात पाय धरले आणि — " अग आई ग " काय ह्या भयंकर वेदना ! तापवून लाल केलेलीं हत्यारें आपल्या अंगांत कोणी भोंसकीत आहे असें तिला वाटलें. आंत — आंत — आणखी आंत —

थांबणार तरी केव्हां हें ? तिनें आपलें ओठ दातांनीं घट्ट दाबून धरले होते – पण ज्या भयंकर यातना तिला होत होत्या त्या सोसणें जवळ जवळ अशक्य होऊं लागलें. एकादा भयंकर प्राणी आपल्या तीक्ष्ण नखांनीं आपलें सारें अंतर्याम फाडीत आहे कीं काय? शरीराचे बारीक बारीक तुकडे करून टाकल्याप्रमाणें तिला होत होतें––नाहीं आतां सोसवत––हळूहळू वेदना कमी झाल्या–– तिचे हात कोणी तरी सोडले. तिनें उठून बसण्याचा यत्न केला––पण डोळ्यांपुढें काजवे चमकले व ती पुन्हां खालीं पडली. "हळु हळू हां बाबी." वृद्ध डॉक्टर प्रेमळपणानें म्हणाले "इतकी लहान आहे पण सगळं सोसलन. हूं कीं चूं केलं नाहीं ! शाबास आहे पोरी तुझी !"

लागलीच तिला दोन नर्सेसनीं उचलून आपल्या बिछान्यांत ठेवली. अजून आंतल्या वेदना होत्याच––पण आतां त्या सोसवण्यासारख्या तरी होत्या किती तरी वेळ डोळे मिटून ती तेथेंच पडली होती. जेव्हां तिनें डोळे उघडले तेव्हां वासिका तिच्या बिछान्याजवळ उभा होता.

"पोरी, मानिका, कसं वाटतं आतां तुला ? बरं आहे ना ?"

"जा. जा. वासिका तूं जा. नाहीं तर इथल्या लोकांना वाटायचं कीं तूंच तो पाजी मनुष्य म्हणुन."

'असं काय बरं मानिका ! मी तुला बघ पाव व लोणी आणलं आहे. तुला भूक लागली असेल नाहीं ? खा तर मग."

दोन दिवसांनीं मानिका घरीं आली ती दृष्टीस पडली मात्र, वीज कडकडावी अशी तिची आई तिच्यावर कडकडली. 'कार्टे, चालती हो माझ्या घरांतून. कुळाला कालिमा फासलास ! मला कळलं नाहीं असं तुला वाटलं असेल ! पण मला सगळं कळलं. तूं कोणाबरोबर इस्पितळांत गेलीस तें ! हडळ कुठली ! .'

असें म्हणून ती मानिकाच्या अंगावर धावली. तिच्या डोक्याला गुंडाळायचें तांबडें फडकें तिनें ओढून घेतलें—आणि तिला ती मारणार तों मानिका उद्गारली —"आई, मला मारूं नको. मी आतां पूर्वीची बावळट पोरगी राहिलें नाहीं. मी तुला घरांत नको असेन तर तसें सांग. मी जातें. पण मला मारण्याचा तुला कांहीं एक अधिकार नाहीं."

हें ऐकतांच तिच्या आईचा राग अधिकच भडकला. आतां जास्त कमी बोलण्यांत अर्थ नाहीं असें पाहून मानिका घराच्या बाहेर आली.—पाहाते तों समोर वोलोडिका उभा ! " आहा. बरी सांपडलीस. पोरी, लाडके, मी किती वाट पाहिली तुझी, पण तूं भेटतच नाहींस मला. चल जरा फिरायला जाऊं "

आतां मात्र मानिकेच्या उरांत धडकी भरली. या सैतानापासून आपली सुटका करणारा कोणी आहे कां म्हणून तिनें एक क्षणमात्र इकडे तिकडे दृष्टी फिरविली आणि एकदम क्लबाच्या दिशेनें धांवत सुटली. समाजशास्त्राचा तास आतांच संपून सर्व सभासद मोकळे झाले असतील या आशेवर ती वाऱ्यासारखी पळूं लागली. वोलोडिकाचीं पावलें हळूहळू जवळ येऊं लागलीं—आणखी एका मिनिटांत तो आपल्याला पकडणार--आणि मग—इतक्यांत पुढें क्लबच्या दारावरचा तांबडा दिवा दिसूं लागला--धापा टाकीतच ती आंत शिरली. तिच्या मागोमाग वोलोडिका आंत येणार तोंच कोणीतरी दरवाज्यांतून त्याला मागें ढकललें.

" काय क्लबाच्या सभासदाला बंदी ? "

" होय. तुझ्या दोस्तांनीं तुझ्या प्रकरणाचा निकाल दिला म्हणजे मग तुला प्रवेश मिळेल. तेथपर्यंत नाहीं. " श्यालो शांतपणें म्हणाला.

श्यालोचा चेहेरा पाहिला मात्र—आणि वोलोडिकानें त्याच पावलीं पळ काढला. हें सर्व होईपर्यंत मानिका भिंतीजवळ मान खालीं घालून उभी होती व तिच्या डोळ्यांत अश्रू आले होते. " हें ग काय पोरी, अशी मान खालीं कां घातलीस ? हा वेडे, अग लाज वाटायचं तुला कांहीं तरी कारण आहे ! जा. लवकर आपल्या वर्गाला जा. नाहीं तर अर्थशास्त्राचा अभ्यास बुडवशील उगीच. "

" मी मुळींच नाहीं मान खालीं घातली " असें म्हणायचें मानिकाच्या मनांत होतें पण कृतज्ञतेमुळें तिच्या तोंडून शब्द निघेना. आपल्या मैत्रिणींच्या हातांत हात घालून तीं तेथून निघून गेलीं. तिचें हृदय त्या प्रेमळ मित्रांच्या उपकारांनीं भरून गेलें होतें. श्यालोच्या डोळ्यांत जें प्रेम तिला दिसलें तें म्हणजे नव्या मनूंतल्या कामकरी वर्गाच्या जुटीचें—एकीचें चित्रच होतें असें तिला वाटलें.

# पचन कसें होतें ?

अन्नामुळें शरीराचें पोषण होतें हें सर्वांस माहीत असतें, परंतु हें पोषण होण्याकरतां प्रथम अन्नाचें पचन होऊन तें रक्तांत मिसळावें लागतें, व हें पचन कसें होतें याची बऱ्याच लोकांस चांगलीशी कल्पना नसते. तें येथें थोडक्यांत पाहूं. याकरतां खालील प्रयोग करून पाहण्यासारखा आहे.

दिव्याची कांचेची चिमणी घेऊन तिच्या एका टोंकावर सुतळीनें चर्मपत्र बांधावें. कांचेचें एक मोठें भांडें घेऊन त्यांत चिमणीचें बांधलेलें टोंक बुडवावें. नंतर कांहीं पाणी बरेंच खारट करून त्या चिमणींत ओतावें. हें केल्याबरोबर खालच्या भांड्यांत चर्मपत्रापासून खालपर्यंत प्रवाह सुरू झालेले दिसतील. हे प्रवाह पाण्याचे नव्हे, कारण चिमणींतील पाणी कमी होत नाहीं. हे प्रवाह मिठाचे होत, व जोंपर्यंत खालच्या पाण्यांत वरच्यापेक्षां कमी मीठ आहे तोंपर्यंत ते चालू राहतील. खालीं खारें पाणी व वर गोडें घातल्यास उलट प्रवाह सुरू होतील. मिठाऐवजीं साखर घातली तरी हीच स्थिति होते, परंतु खाऱ्या पाण्याऐवजीं जर अंड्याचा बलक घातला तर प्रवाह दिसत नाहींत. याप्रमाणें आपल्या अन्नांत दोन प्रकारचे पदार्थ असतात. कांहीं मीठाप्रमाणें चर्मपत्रांतून पार जाणारे व कांहीं न जाणारे.

आपल्या पोटांत अन्न गेल्यावर तें अन्ननलिकेच्या चर्मपत्रासारख्या बाजूंतून पार जाऊन तें रक्तांत मिसळेल तरच त्याचा शरीरास उपयोग आहे, परंतु अन्नांतील कांहीं पदार्थ तर पार जाऊं शकत नाहींत. तेव्हां त्यांचें रूपांतर होऊन ते पहिल्या प्रकारच्या पदार्थांच्या सदरांत येतील तरच ते रक्तांत मिसळतील. त्यांचें रूपांतर पचनक्रियेनें होतें, व या क्रियेचें महत्त्व यावरून लक्षांत येईल.

ही पचनाची क्रिया अन्ननलिकेंत होते. या नलिकेचें एक टोंक म्हणजे तोंड व दुसरें टोंक म्हणजे गुदद्वार. तोंडांतील लाळ, जठरांत उत्पन्न होणारा जठररस, वगैरेंची रासायनिक क्रिया अन्नावर झाल्यामुळें त्याचें पचन होतें. अन्न

घशांतून जठरांत उतरतें, तेथें तें कांहीं वेळ राहून त्याचें थोडेंबहुत रूपांतर होऊन तें लहान आंतड्यांत उतरतें, व त्यांतील उपयोगी भाग आंतड्याच्या बाजूंतून रक्तांत मिसळतो, व बाकीचा भाग मोठ्या आंतड्यांत ढकलला जाऊन गुदद्वारावाटे बाहेर पडतो.

या त्याच्या मार्गांत निरनिराळ्या पेशी असून त्यांतून वेगवेगळे पाचकरस बाहेर पडून पचनास मदत होते. जठराच्या व आंतड्याच्या भिंतींतच पेशी असतात, परंतु लालोत्पादक पिंड, पित्ताशय व स्वादुपिंड हे अन्ननलिकेच्या बाहेर असून त्यांचा रस मात्र अन्ननलिकेंत उतरतो. गालांच्या आंतल्या बाजूला व जिभेच्या खालीं पिंड असतात त्यांतून लाळ उत्पन्न होते. जठराचे बाजूस पित्ताशयांत पित्त उत्पन्न होऊन तें लहान आंतड्यांच्या प्रथम भागांत येतें, व स्वादुपिंडांतील रसही तेथेंच येतो. या सर्व रसांच्या क्रियेनें मिळून अन्नांतील वेगवेगळ्या प्रकारच्या पदार्थांचें पचन होतें.

पोळी किंवा भाकरी चावून गिळण्याऐवजीं तशीच तोंडांत पांच दहा मिनिटें ठेवल्यास ती गोड लागूं लागते, म्हणजे पिठाच्या कांहीं भागाची लाळेच्या रासायनिक क्रियेनें साखर बनते, म्हणजे पचनाला तोंडांतच सुरवात होते. लाळ हा एक पाचक रस आहे, व ती अन्नाशीं नीट मिसळावी म्हणून अन्न चांगलें चावून नंतर गिळल्यास त्याचें पचन अधिक चांगलें होतें.

जठररसांत हायड्रोक्लोरिक ॲसिड नांवाचा आम्ल पदार्थ असून शिवाय दोन पाचकरस असतात यापैकीं एकानें दुध दह्यासारखें घट्ट होतें. कांहीं प्राण्यांच्या पोटांतून हा पदार्थ घेऊन त्याचा उपयोग पनीर ( चीझ् ) करण्याकडे करतात. दुसऱ्या (पेपसीन्) पाचक रसानें अंड्याच्या बलकासारख्या पदार्थांचें रूपांतर होऊन पेप्टोन बनतें.

पित्ताशयांतून पित्त येऊन त्याचें चरबीच्या जातीच्या ( तेल, तूप ) पदार्थांशीं मिश्रण होतें व यामुळें रूपांतरास मदत होते..

स्वादुपिंडाच्या ( पॅंक्रिआस ) स्रावांत तीन पाचकरस असतात. एकानें लाळेप्रमाणें पिठाची साखर होते. दुसऱ्यानें बलकाच्या जातीच्या पदार्थांचें पेपटोन

होऊन पेपटोनचें आणखी रूपांतर होतें. तिसऱ्यानें चरबीसारख्या पदार्थाच्या वर सांगितलेल्या मिश्रणांचें रूपांतर होऊन आम्ल व ग्लिसरीन नांवाचा गोड पदार्थ बनतात.

आंतड्यांतूनहि एक स्राव होत असतो व त्यांत अनेक पाचक रस असतात, व त्यांनीं पचनास मदत होते. साखरेचे अनेक प्रकार असतात, त्यांपैकीं फळांत किंवा मधांत असणाऱ्या ग्लूकोज नांवाच्या प्रकाराचाच शरीरास उपयोग असतो. इतर प्रकारांचें पचनानें रूपांतर होऊन हा एकच प्रकार आंतड्याच्या पाचकरसांनीं बनतो.

पाव, लोणी, व मांसाचा एक तुकडा एकदम तोंडांत घातला अशी कल्पना करूं. तो घांस चांगला चावल्यानें त्याचे अत्यंत बारीक तुकडे होऊन त्यांत लाळ मिसळल्यामुळें त्यांतील पावाच्या तुकड्याची साखर बनूं लागते, पण इतक्यांत तो घांस गिळल्यामुळें जठरांत जातो. त्यांतील इतर पदार्थांवर लाळेचा परिणाम होत नाहीं. जठरांतील आम्ल व पेपसीन् यांच्या संयुक्त क्रियेनें मांसाचें अंशत: रूपांतर होऊन पेपटोन बनतें, व लाळेनें पावाची साखर बनण्याचें काम चालू राहतें. हें अन्न जठरांत दोन तास राहतें, पण अजून लोणी जसेच्या तसेंच असतें. नंतर तें अर्धवट पचलेलें अन्न जठरांतून लहान आंतड्यांत जातें. पावाच्या राहिलेल्या भागाची येथें साखर होते, मांसाच्या राहिलेल्या भागाचें पेपटोन् बनतें व पुढें त्याचें आणखी रूपांतर व पृथक्करण होतें, व लोण्याशीं पित्त मिश्रित होतें, व या मिश्रणापासून आम्ल व ग्लिसरीन् तयार होतात. याप्रमाणें सर्व भागांचें रूपांतर होऊन मांसांत व पावांत असलेलें मीठ मात्र वेगळें होतें. हे पदार्थ जसजसे तयार होतात तसतसे आंतड्याच्या बाजूंतून पार जाऊन रक्तप्रवाहांत मिसळतात व सर्व शरीरभर फिरून त्याच्या डागडुजीस लागणारें साहित्य व हालचालीस लागणारी शक्ति पुरवतात.

हे पाचकरस केव्हां व कसे उत्पन्न होतात ? हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. आपल्या आवडीचे पदार्थ दृष्टीस पडल्यास, किंवा त्यांच्या वासानें किंवा कल्पनेनेंही तोंडास पाणी सुटतें. म्हणजे प्रत्यक्ष शारीरिक किंवा मानसिक कारणांनीं लाळ

उत्पन्न होते. जठररसाचीही अशीच गोष्ट आहे. यामुळें आवडीचे पदार्थ, अतिरेक न केल्यास, आपणास सहज पाचतात. इतर पाचकरसांची उत्पत्ति थोडीशी भानगडीची आहे. थोडासा जठररस लहान आंतड्यांत जातो व त्याच्या स्पर्शानें तेथें सेक्रेतीन नांवाचा एक पदार्थ उत्पन्न होऊन रक्तांतून पित्ताशयांत व स्वादुपिंडांत गेल्याबरोबर या दोन पिंडांतून स्राव होऊं लागतो, जणूं काय सेक्रेतीनमुळें या दोन पिंडांस अन्न जवळ आल्याची बातमी पोंचते, व याच रीतीनें आंतड्यांतूनही पाचक स्राव होऊं लागतो. यामुळें अन्न येण्यापूर्वीच हे सर्व रस पचन करण्यास सज्ज होऊन बसतात.

लहान आंतड्याकडे केवळ पचलेलें अन्न गाळून रक्तांत सोडण्याचेंच काम असतें असें नाहीं. समजा आपण लोणी किंवा तुपाच्या रूपानें गाईची किंवा म्हशीची चरबी खाल्ली तर ती जशीच्या तशीच मनुष्याच्या शरीरांत चरबी म्हणून राहूं शकत नाहीं. तिचें रूपांतर व पृथक्करण होऊन त्या घटकांपासून मानवी चरबी बनते व हें संयोगीकरणाचें काम लहान आंतड्याकडे असतें. मांसापासून मांस बनतें खरें, परंतु इतर मांसापासून मानवी मांस बनतें, यामुळें बकऱ्याचें मांस खाल्ल्यानें स्वभाव बकऱ्यासारखा होत नाहीं व वाघाचें खाल्ल्यानें वाघासारखाही होत नाहीं.

स्नायूंस केवळ साखरेचाच उपयोग असतो. शरीराचे प्रत्येक हालचालीचे वेळीं थोड्याशा साखरेचा नाश होतो. आपण खाल्लेली साखर, किंवा खाल्लेल्या पिठापासून बनलेली साखर, ग्लूकोजच्या रूपांत पित्ताशयांत येते व किंचित् रूपांतर होऊन तेथें राहते व ती जरूर लागेल तसतशी ग्लूकोजच्या रूपांत स्नायूंना पुरविण्याचें काम पित्ताशयाकडे आहे. स्नायूंमधेंही थोडासा ग्लूकोजचा संचय होऊं शकतो.

त्याचप्रमाणें चरबीचाही संचय त्वचेच्या खालीं होऊन तेथें थर जमतात, व या चरबीचा जरूर तसा उपयोग होतो. परंतु अन्नांत पीठ किंवा साखर भरपूर असल्यास या चरबीचा कधींच उपयोग होत नाहीं इतकेंच नाहीं तर अन्नांतील चरबीमुळें हे थर वाढत जातात. याकरतां लठ्ठ माणसांनीं चरबी, पीठ व साखर हे पदार्थ बेतानें खावे.

मांस, अंड्याचा बलक वगैरेंचा उपयोग शरीराची झीज भरून काढण्याकडे असतो, व हे सांचून राहूं शकत नाहींत. हे फाजील खाल्ल्यास डोकें, सांधे वगैरे दुखतात व एकंदर अस्वास्थ्य उत्पन्न होतें. तेव्हां मांस बेतानें खाणें बरें.

बऱ्याच लोकांत यासंबंधीं अशी एक विचित्र कल्पना प्रचलित आहे कीं मांस पचण्यास जड असल्यामुळें तें खाल्ल्यास दारु प्यावी लागते. वास्तविक मांसाहार पचण्यास सुलभ असतो व आजारी मनुष्यासही चालतो. त्याला दारू पिण्याची बिलकूल जरूर नसते.

---

# पत्रव्यवहार.

१. × ×

१९–२–२९

सा. न. वि. वि. आपला फेब्रुआरी १९२९ चा अंक पोंचला. तो वाजून सुचलेले कांही विचार आपणास कळवीत आहें.........

१. 'प्रेमात्मक विवाह' लेखांक दुसरा, या लेखांत प्रेम या शब्दाची व्याख्या कोठें दिसत नाहीं. लेखांक १ मधें आली असल्यास माहिती नाहीं, नसल्यास आपले मताप्रमाणें प्रेमाचें अस्तित्व आपणांस मान्य असल्यास केव्हां तरी व्याख्या येईल अशी आशा आहे.

२. पावित्र्यासंबंधानें लिहून आलेल्या मजकुरांत पावित्र्य आणि शुद्धता या दोन अगदीं निरनिराळ्या कल्पना आहेत असें सांगितलें आहे, परंतु पावित्र्य म्हणजे काय तें संबंध लेख वाचला तरी समजत नाहीं. कौमार्याला दिलेली फाजील किंमत वेडगळपणाची आहे, परंतु थोडी अथवा मुळींच किंमत द्यावी अथवा नाहीं किंवा दिल्यास वेडगळपणाच होईल किंवा काय.

३. संततिनियमनाची तिसरी आवृत्तीबद्दल जाहिरात वाचून संततिनियमन शब्दाचा अर्थ काय असावा याबद्दल वादविवाद झाला. कोणत्याही मराठी कोशांत अर्थ दिलेला असेल असेल तर किंवा आपले मताप्रमाणें हा शब्द काय दर्शवितो

तें सवडीप्रमाणें कळवावें. माझे मताप्रमाणें गर्भधारणाप्रतिबंधशास्त्र इतकाच असावा.........

× × ×

[ १. ज्या पुस्तकाचा हा सारांश आहे त्यांत एक विशिष्ट प्रकारचा विवाह रूढ व कायदेशीर व्हावा असें सांगितलें आहे. त्या विवाहांत विशेष गोष्टी म्हणजे पतिपत्नींनीं वाटेल तितके दिवस संतति बंद ठेवणें, व संतति नसलेल्या जोडप्यास त्यांपैकीं एकाच्याही इच्छेनें घटस्फोट मिळणें, या आहेत. याचा अर्थ असा कीं कांहीं दिवस एकत्र राहून आपलें एकमेकांशीं पटेल अशी खात्री होईपर्यंत सर्व जोडप्यांनीं संतति बंद ठेवावी, म्हणजे पटत नाहीं असें वाटल्यास घटस्फोटास अडचण पडणार नाहीं. याचा सारांश आम्हीं असा काढला कीं प्रेम संपलें म्हणजे विवाह संपावयचा व तें कायम टिकेल असें वाटेपर्यंत शारीरिक प्रेमाचे परिणाम बंद ठेवायचे, असा आशय येण्याकरतां ‘ प्रेमात्मक विवाह ’ हें नांव दिलें आहे.

प्रेमाची व्याख्या वरील ग्रंथांत आहे असें वाटत नाहीं, परंतु त्याची सामान्य व्याख्या अशी देतां येईल कीं एखाद्या वस्तूचा किंवा व्यक्तीचा आपणास शक्य तितका निकट व निरंतर सहवास घडावा असें वाटणें, याचें नांव प्रेम. प्रेमाचें अस्तित्व आम्हांस मान्य आहे इतकेंच नव्हे तर आमचे मतें प्रत्येक मनुष्यास कमीअधिक प्रमाणांत प्रेमाचा अनुभव येतोच. अर्थात स्वभावपरत्वें त्याचें आविष्करण वेगवेगळ्या प्रकारांनीं होईल. परंतु भटांनीं लग्न लावलें कीं त्या दोन व्यक्तींमध्यें प्रेम उत्पन्न झालेंच पाहिजे ही कल्पना हास्यास्पद आहे. तें त्या दोन व्यक्तींच्या शारीरिक व मानसिक गुणांवर अवलंबून राहील. प्रेम हें कर्तव्य झालें कीं तें वेश्यांच्या प्रेमाच्या सदरांत जाईल.

२. आपली शंका सदहू लेखकाकडे पाठविली. ते उत्तरतात:—‘ पावित्र्याची प्रचलित कल्पना काय आहे व ती कशी चुकलेली आहे हेंच दाखविण्याचा आमचा उद्देश होता. आमच्या मतें जेव्हां जेव्हां स्त्रीपुरुषांच्या पूर्ण संमतीनें व रोगप्रतिबंधाची व जरूर तर संततिनियमनाची पूर्ण काळजी घेऊन संयोग होतो, तेव्हां तेव्हां तो पवित्र म्हणजेच शुद्ध समजावा. मग त्याचें धार्मिक किंवा

कायदेशीर लग्न व आजन्म प्रेम करण्याच्या आणाशपथा झाल्या आहेत कीं केवळ एकमेकांस कांहीं काळ सुख देण्याचाच त्यांचा हेतु आहे इत्यादि प्रश्नच उपस्थित होत नाहींत. लग्न झालें असून सुद्धां संमति नसेल ( मग वय कितीही असो ) तर तो संबंध अनिष्ट व अपवित्रच होईल.

हल्लीं नवऱ्याखेरीज कोणाही पुरुषाशीं—इच्छेनें किंवा इच्छेविरुद्ध संयोग झालेली स्त्री अपवित्र मानतात; हा अर्थ आम्हांस मान्य नाहीं. बळजबरी हा एकप्रकारचा अपघात आहे. ज्याच्या घरांत चोरी झाली व ज्याच्या घरांत झाली नाहीं अशा दोन माणसांत, किंवा ज्याचा पाय गाडीखालीं सांपडून मोडला व ज्याचा मोडला नाहीं अशा दोघांत आपण सामाजिक दृष्ट्या फरक मानीत नाहीं, त्याचप्रमाणें जिच्यावर बळजबरी झाली व जिच्यावर झाली नाहीं, अशा दोन स्त्रियांत तेवढ्यामुळें फरक मानतां कामा नये.

कौमार्याला आमचे मतें मुळींच किंमत देण्याचें कारण नाहीं. स्त्रियांवर मालकी चालवण्याची कल्पना नाहींशी झाली म्हणजे कौमार्याची किंमत आपोआप कमी होईल.'

फूल वापरल्यानें कोमेजतें म्हणून अनाघ्रात पुष्पाला जास्त किंमत देणें, किंवा अनाविद्ध रत्नाला नावीन्यामुळें किंमत देणें, याच तत्त्वावर अविद्धयोनि स्त्रीची महति समजणें चुकीचें आहे अनेक स्त्रियांचा अनुभव घेतलेला कामशास्त्रांतील प्रसिद्ध इटॅलिअन् तज्ज्ञ कॅसानोव्हा याला केवळ स्वार्थी उपभोगाच्या दृष्टीनें सुद्धां कौमार्याची किंमत वाटत नसे, इतकेंच नाहीं तर कुमारिकेचा नवशिकेपणा त्याला थोडासा नडतच असे. येथीलही कांहीं तज्ज्ञांनी आह्मांस असेंच मत दिलें आहे.

३. 'संततिनियमन' याचा अर्थ संतति नियमित ठेवणें, मर्यादेंत ठेवणें, फाजील वाढूं न देणें. हें दोन मार्गांनी करतां येईल, एक गर्भधारणेचा प्रतिबंध करून, किंवा गर्भाचा पोटांतच किंवा उपजल्यावर नाश करून. हा दुसरा मार्ग बहुतेक सर्व देशांत गुन्हा समजला जातो. स्त्रीच्या जीवाला गर्भावस्थेपासून धोका असेल तर मात्र याला कायद्याची परवानगी असते व तो आहे कीं नाहीं हें डॉक्ट-

रांनीं ठरवावयाचें असतें. सॉव्हिएट रशिया व स्वित्झर्लंडमध्यें मात्र स्त्रीच्या खुषीनें तीन महिन्यांचे आंत गर्भपात करवतां येतो.—सं ]

२

२१-२-२०

सा. न. वि. वि. आपले मासिकाला वर्गणीदार व्हावें कीं नाहीं या संबंधानें समाजांत कुरकुर चालत असलेली ऐकण्यांत येते परंतु तो वाचायला पुष्कळांना पाहिजे असतो असेंही त्याच्या बरोबर ऐकण्यांत येतें.

माझी आपणाला अशी सूचना आहे कीं आपले मासिकाला जे वर्गणीदार आहेत त्यांचें लिष्ट आपण प्रसिद्ध करावें. अशीं नांवें प्रसिद्ध झालीं असतां त्याचा एकेमेकांना बराच उपयोग होणें शक्य आहे असें मला वाटतें. पुढील अंकांत आपण हें पत्र जरूर तर प्रसिद्ध करावें व जर कोणाची हरकत असेल तर त्यांनीं आठ दिवसांचे आंत आमचें नांव प्रसिद्ध करूं नये म्हणून लिहून पाठवावें म्हणजे नांव प्रसिद्ध करण्यांत येणार नाहीं.

आपलाXXX

[ सूचना ठीक आहे, परंतु त्यांत थोडा फरक करून ती अंमलांत आणूं. म्हणजे, नांव प्रसिद्ध करण्यास हरकत नाहीं असें जे कळवितील, त्यांचींच नांवें प्रसिद्ध होतील. इतरांचीं होणार नाहींत—स. ]

---

१९२३ सालीं बंगाल्यांत गर्मी व परम्याचे मिळून १००००० नवीन रोगी इस्पितळांत व दवाखान्यांत गेले होते.

मुंबईतील जे. जे. इस्पितळांत येणाऱ्या सर्व रोग्यांपैकीं शेंकडा ४०स गुप्त रोग असततात.

× × ×

येथील ' इंडिअन् डेली मेल् ' पत्राचे संपादक श्री. के. नटराजन यांनीं गुप्त रोगप्रतिबंधासंबंधीं जाहिरात छापण्याचें नाकारलें हे गृहस्थ स्वतःस समाज-सुधारक म्हणवतात, परंतु गुप्त रोगांचा प्रतिबंध करतां कामा नये, त्यांचा प्रसार होईल तितका बरा, अशी त्यांची कल्पना दिसते.

× × ×

माजी लॉर्ड् सिंह यांचे जांवई श्री. नगेंद्रनाथ गुप्त यांनीं आपल्या बायकोवर श्री. तुलसीचरण गोस्वामी यांशीं व्यभिचार केल्याचा आरोप ठेवून कलकत्त्याचे हायकोर्टांत घटस्फोटाचा अर्ज केला आहे व सदहू गृहस्थांकडून अब्रुनुकसानीबद्दल दीड लाख रुपये मागितले आहेत. श्री. गोस्वामी हे जमीनदार असून लेजिस्लेटिव् असेंब्लीचे सभासद आहेत.